दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com | Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ रविवार, दि. १४ जून २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ५५ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


### अजिनोमोटॉचे संकट : तुकाराम मुंडेंच्या कडक कारवाईची गरज

आज गल्लीबोळांत आणि चौकाचौकांत उगवलेली 'चायनीज सेंटर' म्हणजे चवीच्या नावाखाली आरोग्याचा उघड-उघड खेळ मांडणारी केंद्रे बनली आहेत. फास्ट फूड, पिझ्झा आणि रस्त्यावरील चायनीज खाऊन स्वतःच्या शरीराचे वाटोळे करून ...

---> अग्रलेख - पान 2 वर

### पुण्यात सोमवारपासून 25 टक्के पाणीकपात

**पुणे :** यंदा पावसाळा लांबल्यामुळे आणि धरणसाठ्यात घट झाल्याने पुणे महापालिकेने पाणीपुरवठ्यात २५ टक्के कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. सोमवारपासून (१५ जून) शहरात सम–विषम तारखेनुसार एक दिवसाआड पाणीपुरवठा लागू होणार असून याचे सविस्तर वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. सध्या खडकवापसला डॅम धरणसाखळीत सुमारे ५.०३ टीएमसी पाणी शिल्लक असून त्यातील सुमारे ३ टीएमसी पाणी शहरासाठी उपलब्ध आहे. या पार्श्वभूमीवर पाणीवापरावर काटकसरीचे निर्बंध लागू करण्यात आले. तसेच भारतीय हवामान विभागाने यंदा सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज व्यक्त केल्याने प्रशासनाने हे पाऊल उचलले आहे.

# भारताने अफगाणिस्तान विरुद्धची पहिली ODI सात विकेट्सनी जिंकली

## शुभमनचे शानदार अर्धशतक; रोहितचा विक्रम



**धर्मशाळा :** हिमाचल प्रदेश क्रिकेट असोसिएशन स्टेडियम येथे झालेल्या अफगाणिस्तान विरूद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात अर्थात वन डे इंटरनॅशनलमध्ये (ODI) भारताचा विजय झाला. पावसामुळे हा सामना २५ - २५ षटकांचा करण्याचा निर्णय झाला. नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेणाऱ्या भारताने सामना सहज जिंकला. कर्णधार असलेल्या शुभमन गिलने या सामन्यात ६६ चेंडूत २ षटकार आणि ११ चौकारांच्या जोरावर नाबाद ८४ धावा केल्या. भारताकडून शुभमननेच सर्वाधिक धावा केल्या. केएल राहुलने नाबाद ३९, ईशान किशनने ३४, रोहित शर्माने १६ आणि श्रेयस अय्यरने १२ धावा केल्या. भारताने २२.५ षटकांत ३ बाद १९५ धावा करून सामना सात विकेट्सनी जिंकला. अफगाणिस्तानकडून झिया उर रहमान शरीफीने श्रेयस अय्यरला सलीम साफीकरवी झेलबाद केले तर रशीद खानने ईशानला त्रिफळाचीत केले. रोहित शर्मा धावचीत झाला.

याआधी प्रथम फलंदाजी करणाऱ्या अफगाणिस्तानने २४.५ षटकांत सर्वबाद १९४ धावा केल्या. भारताकडून गुरनूर ब्रार आणि हर्ष दुबेने प्रत्येकी तीन तर अर्शदीप सिंग आणि नितीश कुमार रेड्डीने प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. अफगाणिस्तानकडून रहमानुल्लाह गुरबाजने ५१ चेंडूत ८ षटकार आणि ८ चौकारांच्या जोरावर १०२ धावा केल्या. पण ही शतकी खेळी वाया गेली. अफगाणिस्तानकडून इब्राहिम झाद्राननेे एक, सेदिकुल्लाह अटलने शून्य, रहमत शाहने तीन, हशमतुल्लाह शाहिदीने २७, अझमतुल्लाह ओमरझाईने २६, मोहम्मद नबीने ९, रशीद खानने ९, एएम घझनफरने शून्य, झिया उर रहमान शरीफीने चार, मोहम्मद सलीम साफीने नाबाद एक धाव असे योगदान दिले.

अफगाणिस्तान विरुद्धची पहिली वन डे जिंकून भारताने तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. मालिकेतील दुसरा सामना बुधवार १७ जून रोजी लखनऊ येथे एकाना स्टेडियमवर होणार आहे. यानंतर तिसरा सामना शनिवार २० जून रोजी चेन्नईच्या चिदंबरम स्टेडियमवर होणार आहे. आयसीसी वन डे रँकिंगमध्ये ११८ रेटिंगसह भारत पहिल्या स्थानी आहे तर ११३ रेटिंगसह न्यूझीलंड दुसऱ्या स्थानावर आहे. अफगाणिस्तान आयसीसी वन डे रँकिंगमध्ये ९३ रेटिंगसह सातव्या स्थानावर आहे.

रोहित शर्मा अफगाणिस्तान विरूद्धच्या पहिल्या वन डे मध्ये १६ चेंडूत १६ धावा करून परतला. तो धावचीत झाला. याआधी त्याने १ षटकार आणि २ चौकार मारले. विशेष म्हणजे रोहितने आजच्याच सामन्यात सहा धावा केल्यानंतर नवा विक्रम नोंदवला.

## आईने चार मुलांना विषारी थंडपेय पाजून स्वत:ही केले विषप्राशन

### तिघांचा मृत्यू, दोन मुलांची प्रकृती गंभीर

**रायगड :** रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात घडलेल्या एका हृदयद्रावक घटनेने संपूर्ण परिसर शोकमग्न झाला आहे. खरवली आदिवासी वाडी येथे एका आईने आपल्या चार लहान मुलांना विषारी थंडपेय पाजल्यानंतर स्वतःही विषप्राशन (Poison) केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या दुर्दैवी प्रकारात आईसह दोन चिमुकल्या मुलींचा मृत्यू झाला असून दोन मुलांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, आशा जाधव (वय 29) यांनी बाजारातून आणलेल्या थंडपेयामध्ये विषारी औषध मिसळले. त्यानंतर त्यांनी आपल्या चार मुलांना ते थंडपेय पाजले आणि स्वतःही ते प्राशन केले. काही वेळातच सर्वांची प्रकृती बिघडू लागली. उलट्या आणि अस्वस्थता वाढल्यानंतर शेजाऱ्यांनी आणि स्थानिक नागरिकांनी तातडीने त्यांना रुग्णालयात दाखल केले.

मात्र उपचारादरम्यान आशा जाधव यांच्यासह त्यांच्या दोन मुलींचा मृत्यू झाला. मृतांमध्ये आशा जाधव, नंदिनी जाधव (वय 7) आणि दुर्वा जाधव (वय 6) यांचा समावेश आहे.

या घटनेत इतर दोन मुलांचे प्राण वाचले असले तरी त्यांची प्रकृती अत्यंत गंभीर असून माणगाव उपजिल्हा रुग्णालयातील अतिदक्षता विभागात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. डॉक्टरांकडून त्यांना वाचवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या टोकाच्या निर्णयामागचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. इतर कोणते कारण यामागे होते का, याचा तपास सुरू आहे. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन तपासाची चक्रे फिरवली असून कुटुंबीय आणि नातेवाईकांकडून माहिती घेतली जात आहे.

या घटनेमुळे संपूर्ण रायगड जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत असून, दोन निष्पाप चिमुकल्यांचा मृत्यू आणि दोन मुलांचे मृत्यूशी सुरू असलेले युद्ध यामुळे नागरिकांमध्ये दुःख आणि संतापाचे वातावरण आहे.

## थोडक्यात वार्ता

### लेफ्टनंट जनरल धीरज सेठ नवे लष्करप्रमुख



**नवी दिल्ली :** लेफ्टनंट जनरल धीरज सेठ आता देशाचे नवे 'चीफ ऑफ आर्मी स्टाफ' अर्थात लष्करप्रमुख असणार आहेत. राष्ट्रपतींच्या अनुमतीने लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांची ३० जून पासून चीफ ऑफ आर्मी स्टाफपदी नियुक्ती करण्यात येत आहे. व्हाईस जनरल उपेंद्र द्विवेदी यांच्याकडून ते पदभार स्वीकारतील, असे संरक्षण मंत्रालयाने शनिवारी जारी केलेल्या पत्रकात म्हटले आहे. लेफ्टनंट सेठी सध्या व्हाईस चीफ ऑफ आर्मी स्टाफ पदावर कार्यरत आहेत. यंदा एप्रिल महिन्यात त्यांनी या पदाचा कार्यभार स्वीकारला होता. लेफ्टनंट सेठ हे पुण्याजवळच्या खडकवासला इथल्या नॅशनल डिफेन्स अकादमीचे विद्यार्थी आहेत. डिसेंबर १९८६ मध्ये ते लष्करात रुजू झाले.

### पंढरपूरच्या विठ्ठलाचे दर्शन दोन दिवस बंद राहणार



**पंढरपूर :** पंढरपुरचे विठ्ठल मंदिर २३ आणि २४ जून रोजी विठ्ठल मंदिर सर्व प्रकारच्या दर्शनासाठी पूर्णपणे बंद राहणार आहे. भाविकांनी हे दोन दिवस पंढरपूरला येऊ नये, असे आवाहन मंदीर प्रशासनाकडून करण्यात आले आहे. झिजत असलेल्या विठ्ठल मूर्तीची झीज रोखण्यासाठी अखेर २३ते २४ जून दरम्यान पुरातत्व विभागाकडून विठ्ठल मूर्तीवर लेपन प्रक्रिया होणार असून २३ आणि २४ जून रोजी विठ्ठल मंदिर सर्व प्रकारच्या दर्शनासाठी पूर्णपणे बंद राहणार आहे. २२ जून ते २४ जून दरम्यान रासायनिक पद्धतीनेच हे लेपन होणार असून पुरातत्व विभाग नियमानुसार विठ्ठल मूर्तीवर लेपन करणार आहे. त्यामुळे २३ व २४ जून रोजी विठ्ठल मंदिर पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. विठ्ठल मूर्तीच्या पायाला एक खड्डा पडला असून इतर ठिकाणीही मूर्तीवर मोठ्या प्रमाणात झीज झाल्याचे समोर आल्यानंतर आता याच पद्धतीच्या दगडाची पावडर ऑरगॅनिक रसायनात मिसळून मूर्तीच्या झिजलेल्या भागावर लावली जाणार आहे.

### हवाई दलाच्या विमानाचा अपघात; 5 जवान शहीद, 1 गंभीर जखमी

**आसाम :** आसाममधील जोरहाट येथील भारतीय हवाई दलाच्या एअरफोर्स स्टेशनवर शनिवारी सकाळी झालेल्या AN-३२ मालवाहू विमानाच्या भीषण अपघातात पायलटसह पाच जवान शहीद झाल्याची दुर्दैवी माहिती समोर आली आहे. या दुर्घटनेत विमानाचा सहवैमानिक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर लष्करी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अरुणाचल प्रदेशातील नियोजित मोहिम पूर्ण करून हे विमान नियमित उड्डाणानंतर जोरहाट एअरबेसवर परतत होते. मात्र, लँडिंगदरम्यान विमानाला अपघात झाला आणि काही क्षणांतच संपूर्ण परिसरात खळबळ उडाली. प्राथमिक माहितीनुसार, AN-३२ विमान धावपट्टीवर उतरण्याच्या तयारीत असताना तांत्रिक अडचण निर्माण झाली. त्यामुळे विमान मुख्य रनवेवर उतरू शकले नाही आणि एअरबेसमधील गवताळ भागात कोसळले.

### हिमाचलमध्ये ड्रोनद्वारे टपाल वितरणाची चाचणी यशस्वी

**मंडी :** हिमाचल प्रदेशात आता ड्रोनने घरोघरी टपाल पोहोचेल. या दिशेने भारतीय टपाल विभागाने मंडी येथे यशस्वी चाचणी केली. पायलट तत्त्वावर ही चाचणी मंडी प्रधान टपाल कार्यालयापासून रेहडार शाखेपर्यंत करण्यात आली. ड्रोनने टपाल घरोघरी पोहोचवण्याच्या दिशेने असे पाऊल उचलणारे मंडी टपाल कार्यालय देशातील पहिले पोस्ट-ऑफिस बनले आहे. या चाचणीने भविष्यातील स्मार्ट टपाल सेवांचे नवीन चित्र सादर केले आहे. हिमाचलसारख्या दुर्गम भागांसाठी हे फायदेशीर ठरू शकते, कारण येथे डोंगराळ रस्त्यांवर घरोघरी टपाल पोहोचवणे हे आव्हानापेक्षा कमी नाही.

### "खरं की काय"






छत्रपती संभाजीनगर : पैठण सराफ लाईन मध्ये दुकानासमोर वाहने उभी असल्यामुळे ट्रॅफिक जाम होण्याचे प्रकार होत असुन ट्रॅफिक विभागाने लक्ष द्यायला हवे

## युवासेनेच्या जिल्हा युवासंवाद दौऱ्यास उत्स्फूर्त प्रतिसाद; वैजापूरात ऋषिकेश जैस्वाल यांचा कार्यकर्त्यांशी संवाद

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** शिवसेनेची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने युवासेनेच्या वतीने जिल्हाभर सुरू असलेल्या 'जिल्हा युवासंवाद दौऱ्या'स उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. युवासेना मराठवाडा निरीक्षक तथा लोकसभा संपर्कप्रमुख ऋषिकेश जैस्वाल यांनी वैजापूर तालुक्यात विविध ठिकाणी भेटी देत पदाधिकारी, शाखाप्रमुख आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

'गाव तिथे शाखा आणि घर तिथे शिवसैनिक' या संकल्पनेनुसार ग्रामीण व शहरी भागात पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी हा दौरा आयोजित करण्यात आला आहे. पक्षबांधणी तसेच एसआयआर संदर्भातील विविध विषयांवर यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. शिवसेना मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि युवानेते खासदार श्रीकांत शिंदे यांच्या सूचनेनुसार हा जिल्हा युवासंवाद दौरा राबविण्यात येत आहे. गंगापूर-रत्नापूर, वैजापूर, कन्नड-सोयगाव तसेच पूर्व, पश्चिम आणि मध्य विधानसभा मतदारसंघांतील जिल्हा परिषद गट व शहरातील प्रभागांमध्ये बैठका घेऊन कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधला जात आहे. वैजापूर तालुक्यातील वाकला, शिऊर, लासूर, घायगाव आणि सवंदगाव येथे झालेल्या बैठकींना कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती लाभली. यावेळी जिल्हा युवा अधिकारी भारत कदम, श्रीराम गायकवाड, माजी पोलीस अधिकारी संतोष बडे, सागर खरगे, नरेंद्र सरोवर यांच्यासह युवासैनिक उपस्थित होते.

## राज्यस्तरीय हँडबॉल स्पर्धेला सुरुवात

### मंत्री अतुल सावे यांच्याकडून अकॅडमी, शिष्यवृत्ती आणि तालुका लीग स्पर्धांची घोषणा; 27 संघांचा सहभाग



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र राज्य हँडबॉल संघटनेच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय हँडबॉल अजिंक्यपद स्पर्धेचे उद्घाटन राज्य हँडबॉल संघटनेचे अध्यक्ष तथा मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात आणि फ्लड लाईट्सच्या झगमगाटात संपन्न झाले. राज्यभरातील २७ संघांच्या सहभागामुळे स्पर्धेला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून याच स्पर्धेतून राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाची निवड करण्यात येणार आहे.

उद्घाटनप्रसंगी बोलताना मंत्री अतुल सावे यांनी महाराष्ट्रातील हँडबॉल खेळाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण घोषणा केल्या. राज्य हँडबॉल संघटनेची स्वतःच्या मालकीची राज्यस्तरीय अकॅडमी सुरू करण्यात येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. तसेच गुणवंत हँडबॉल खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात येणार असून ग्रामीण भागातील खेळाडूंना अधिक संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी तालुकास्तरीय हँडबॉल लीग स्पर्धा आयोजित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

उद्योजक अजिंक्य सावे यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत सहभागी सर्व खेळाडूंना फिटनेस प्लॅननुसार विशेष आहार व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच फ्लड लाईट्सच्या प्रकाशात सामने खेळण्याचा अनुभव युवा खेळाडूंना मिळत असल्याने त्यांच्यात विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्पर्धेतील साखळी फेरीतील सामन्यांमध्ये कोल्हापूरने चंद्रपूरचा २१-३ असा पराभव केला. पालघरने गडचिरोलीवर १६-१५ अशी निसटती मात केली, तर गडचिरोलीने जळगावचा १५-१३ असा पराभव केला. छत्रपती संभाजीनगरने सोलापूरवर १०-४ असा विजय मिळविला. भंडाऱ्याने सोलापूरचा ११-८ असा पराभव केला, तर रायगडने नांदेडवर १०-६ अशी मात केली. मुंबईने नांदेडचा ११-० असा एकतर्फी पराभव केला. धुळे संघाने ठाण्यावर २३-१० असा मोठा विजय नोंदविला. ठाणे संघाने अकोल्याचा १६-६ असा पराभव केला, तर नागपूरने बुलढाण्यावर १२-८ अशी मात केली. यवतमाळ संघाने नाशिकचा ११-० असा पराभव करत पुढील फेरीत प्रवेश निश्चित केला. उद्घाटन सोहळ्यास जिल्हा हँडबॉल संघटनेचे अध्यक्ष तथा माजी आमदार श्रीकांत जोशी, महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे सहसचिव डॉ. उदय डोंगर, महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे कार्यकारिणी सदस्य सतीश इंगळे, राज्य हँडबॉल संघटनेचे सचिव रणधीर सिंग, राज्य हँडबॉल संघटनेचे सहसचिव पंकज भारसाखळे, स्पर्धेचे मुख्य आयोजक अजिंक्य सावे आणि आयोजक सचिव डॉ. सत्यजीत पगारे यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संदीप जगताप यांनी केले.




# संपादकीय

## अजिनोमोटॉचे संकट : तुकाराम मुंडेंच्या कडक कारवाईची गरज

आज गल्लीबोळांत आणि चौकाचौकांत उगवलेली 'चायनीज सेंटर' म्हणजे चवीच्या नावाखाली आरोग्याचा उघड-उघड खेळ मांडणारी केंद्रे बनली आहेत. फास्ट फूड, पिझ्झा आणि रस्त्यावरील चायनीज खाऊन स्वतःच्या शरीराचे वाटोळे करून घेणाऱ्या नागरिकांना आता आरोग्याचे गांभीर्य स्वतःहून समजेल, अशी चिन्हे उरलेली नाहीत. अशा गंभीर परिस्थितीत, आपल्या कडक शिस्तीसाठी आणि धडक कारवाईसाठी प्रसिद्ध असलेले ज्येष्ठ सनदी अधिकारी तुकाराम मुंडे यांनी आता या बेकायदेशीर चायनीज सेंटर्सवर आणि त्यात प्रामुख्याने वापरल्या जाणाऱ्या 'अजिनोमोटॉ' (मोनोसोडियम ग्लूटामेट - MSG) या घातक केमिकलवर आपले लक्ष केंद्रित करण्याची अत्यंत गरज निर्माण झाली आहे. प्रशासकीय सुस्ती झटकून जनतेला आरोग्याचा खरा आरसा दाखवण्याची वेळ आता आली आहे. चायनीज आणि फास्ट फूडमध्ये चव वाढवण्यासाठी वापरले जाणारे 'अजिनोमोटॉ' हे केवळ एक रसायन नसून, ते शरीराला आतून पोखरून काढणारे एक संथ विष आहे. या अन्नाच्या अतिसेवनामुळे आज लहान मुलांपासून ते तरुणांपर्यंत कित्येकांच्या शरीरात गंभीर आजार आणि कायमचा अधूपणा (शारीरिक अक्षमता) आल्याच्या धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. अत्यंत गंभीर बाब म्हणजे, या रासायनिक अन्नाच्या विळख्यामुळे पोट, यकृत आणि पचनसंस्थेचे असे काही न बरे होणारे विकार जडतात, ज्यांचा असह्य त्रास सहन न झाल्यामुळे काही हताश नागरिकांनी टोकाचे पाऊल उचलत आत्महत्या केल्याच्या दुर्दैवी घटनाही घडल्या आहेत. एका जिभेच्या चवीसाठी माणसाला थेट मृत्यूच्या दारात ढकलणारा हा धंदा आता वेळीच ठेचला पाहिजे. अजिनोमोटॉच्या अतिवापरामुळे मानवी शरीरावर होणारे घातक परिणाम आता वैद्यकीय विज्ञानानेही सिद्ध केले आहेत. या रसायनामुळे मेंदूच्या पेशींवर विपरीत परिणाम होतो, ज्यामुळे तीव्र डोकेदुखी (मायग्रेन), छातीत धडधडणे, उच्च रक्तदाब आणि मज्जासंस्थेचे आजार उद्भवतात. इतकेच नव्हे तर, लहान मुलांमध्ये लठ्ठपणा, यकृताला सूज येणे (फॅटी लिव्हर) आणि अल्सरसारखे गंभीर विकार यामुळे वेगाने वाढत आहेत. 'फूड सेफ्टी अँड स्टँडर्ड्स अथॉरिटी ऑफ इंडिया' (FSSAI) चे नियम धाब्यावर बसवून, आरोग्याला घातक ठरणाऱ्या या घटकांचा सर्रास वापर या उघड्यावरील गाड्यांवर केला जातो. स्वच्छतेचे कोणतेही नियम न पाळता, निकृष्ट दर्जाचे तेल आणि सडलेल्या भाज्या वापरून हा आरोग्याचा खेळ रोज रात्री राजरोसपणे सुरू असतो. आता या संपूर्ण अनागोंदी कारभाराला आणि अन्न भेसळीच्या बाजाराला केवळ तुकाराम मुंडे यांच्यासारखाच धडाडीचा अधिकारी वचक बसवू शकतो. मुंडे यांनी अन्न व औषध प्रशासन (FDA) किंवा संबंधित यंत्रणांच्या माध्यमातून या चायनीज गाड्यांवर, पिझ्झा सेंटर्सवर रात्रीच्या वेळी अचानक धाडी टाकून तपासणी मोहीम हाती घेतली पाहिजे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आणि अजिनोमोटॉचा अवाजवी वापर करणाऱ्या सेंटर्सचे परवाने थेट रद्द करून, त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची कडक भूमिका घ्यावी लागेल. जनतेलाही हे समजायला हवे की, जे अन्न शरीराला अपंग बनवते, ते अन्न असूच शकत नाही. तुकाराम मुंडेंच्या एका धडक मोहिमेमुळे जर या रासायनिक अन्नाच्या विळख्यातून तरुण पिढी वाचली, तर ते राज्यासोबत देशाच्या नागरिकांसाठी आरोग्य रक्षणासाठी एक मोठे आणि क्रांतिकारी पाऊल ठरेल.

## पाकव्याप्त काश्मीरमधील आंदोलनाचा भारताने फायदा घ्यावा

भारताचे तुकडे करून काश्मीरला स्वतंत्र राष्ट्र करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या पाकिस्तानचेच आणखी तुकडे होण्याची वेळ आली आहे असे म्हणावे लागेल कारण पाकिस्तानमधील बलुचिस्तान आणि सिंध प्रांतातील नागरिक पाकिस्तानच्या दडपलशाहीला कंटाळून पाकिस्तानमधून स्वतंत्र होण्यासाठी झटत असताना आता पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिकही पाकिस्तानच्या दडपशाहीविरुद्ध रस्त्यावर उतरून आंदोलन करून पाकिस्तानातून अलग होऊन भारतात सामील होण्यासाठी आंदोलन करत आहेत. बलुचिस्तानला पाकिस्तानपासून स्वतंत्र करण्यासाठी बलुचिस्तान लिबरेशन आर्मी पाकिस्तानशी सशस्त्र लढा देत आहे. पाकिस्तान आर्मी आणि बलुचिस्तान लिबरेशन आर्मी यांच्यात सतत लढाई सुरू असते. सिंध प्रांतातील नागरिकही पाकिस्तानच्या दडपशाहीला कंटाळून रस्त्यावर उतरून पाकिस्तान सरकार विरुद्ध घोषणाबाजी करत स्वतंत्र सिंध राष्ट्राची मागणी करत असतात. आता पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिक तर थेट आम्ही भारतात सामील होऊ इच्छितो म्हणत रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहेत. मागील काही काळापासून पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिक पाकिस्तान सरकारच्या दडपशाहीचा सामना करत आहेत. पाकिस्तान सरकार पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिकांकडे दुर्लक्ष करत असून येथील नागरिकांना पुरेशा प्रमाणात सुविधा उपलब्ध करून देत नाही. पाकिस्तानमधील सरकार पाकव्याप्त काश्मीरमधील साधनसंपत्तीचे शोषण करत असून नागरिकांना कोणत्याही सुविधा देत नाही त्यामुळे तेथील नागरिकांमध्ये पाक सरकार विरुद्ध प्रचंड असंतोष होता त्यात पाकव्याप्त काश्मीरमध्ये निर्मिती केल्या जाणाऱ्या विजेचे प्रचंड बिल पाकिस्तान सरकार इथल्याच नारिकांकडून वसूल करत असल्याने पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिक पाक सरकार विरुद्ध रस्त्यावर उतरले आहे. या आंदोलनाचे नेतृत्व जॉइंट अवामी ॲक्शन कमिटी ( जे ए ए सी ) ही संघटना करत आहे. पाकिस्तान या संघटनेला दहशतवादी संघटना म्हणत असली तरी या संघटनेत डॉक्टर, इंजिनिअर , वकील यासारखे उच्चशिक्षित लोक आहेत. ही संघटना आपल्या न्याय मागण्यांसाठी रस्त्यावर उतरल्या नंतर घाबरलेल्या पाकिस्तान सरकारने हे आंदोलन चिरडण्यासाठी केलेल्या गोळीबारात २० हून अधिक आंदोलकांचा बळी गेला आहे. अर्थात ही आकडेवारी पाकिस्तान सरकारची आहे. प्रत्यक्षात यापेक्षा अधिक लोकांचा बळी गेला असल्याची शक्यता पत्रकारांनी व्यक्त केली असून या गोळीबाराचा जगभरातून निषेध व्यक्त केला जात आहे. ब्रिटनमधील ५० संसद सदस्यांनी पाकव्याप्त काश्मीरमधील परिस्थिवर चिंता व्यक्त केली असून युरोपातील काही शहरात पाकिस्तानच्या अत्याचाराविरोधात निदर्शने करण्यात आली आहे. भारतानेही पाकव्याप्त काश्मीरमधील परिस्थितीवर चिंता व्यक्त करत पाकव्याप्त काश्मीरमध्ये झालेल्या गोळीबाराला मानवी संहार असे म्हटले असून यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाने पाकिस्तानला जबाबदार धरावे अशी मागणी केली आहे. पाकिस्तानने मात्र नेहमीप्रमाणे या आंदोलनाला भारताची फूस असल्याचे म्हणत या आंदोलनासाठी भारताला जबाबदार धरले आहे. हे आंदोलन करणारी जे ए ए सी ही संघटना गद्दार असून या संघटनेला भारताकडून आर्थिक पाठबळ पुरवले जात असल्याचा आरोप पाकिस्तान सरकारने केला आहे अर्थात भारताने हा आरोप फेटाळला असून पाकिस्तानमधील नागरिक सरकार विरुद्ध रस्त्यावर का उतरत आहेत याचे आत्मपरीक्षण करण्याचा सल्ला पाकिस्तान सरकारला भारताने दिला आहे. बलुचिस्तान, सिंध प्रांत आणि पाकव्याप्त काश्मीर मधील साधन संपत्तीचा पाकने वापर करून घेतला पण तेथील नागरिकांना मूलभूत सुविधा पुरवल्या नाहीत. तेथील नागरिकांवर सतत अन्याय अत्याचार केला. तेथील नागरिकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला. नागरिकांवर बळाचा वापर करून दडपशाही केली. तेथील नागरिकांचे जगणे मुश्किल केले. महागाई प्रचंड वाढवली. तेथील नागरिकांना एकवेळेचे पुरेसे अन्न मिळणे देखील मुश्किल झाले म्हणूनच पाकव्याप्त काश्मीरमधील या आंदोलनात आम्हाला एकवेळेचे अन्न देखील मिळत नाही. अन्नासाठी आम्ही भारतातही जाऊ शकतो असे दावे काही आंदोलकांनी केले. काही आंदोलकांनी तर थेट भारतात सामील होण्याची मागणी केली. अर्थात भारताने या मागणीवर कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही मात्र आज ना उद्या भारताला यावर बोलावेच लागेल. वास्तविक भारतासाठी ही सुवर्णसंधी आहे. पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिकांच्या या असंतोषाचा फायदा घेऊन भारताने पाकव्याप्त काश्मीर पाकिस्तानधून मुक्त करून भारताला जोडण्यासाठी प्रयत्न करावा अर्थात हे वाटते तितके सोपे नाही हे जरी मान्य केले तरी तरी यानिमित्ताने चालून आलेली ही संधी भारताने साधायला हवी हे ही तितकेच खरे आहे.

**- श्याम ठाणेदार दौंड जिल्हा पुणे**

## लोकशाहीचा आरसा : बारा वर्षांच्या प्रवासाचे तटस्थ चिंतन

"एखाद्या राष्ट्राची खरी ओळख त्याच्या सत्ताधाऱ्यांमध्ये नसते; ती त्या राष्ट्रातील सामान्य नागरिकांच्या आशा, संघर्ष आणि स्वप्नांमध्ये असते."

भारत ही जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे. विविध भाषा, संस्कृती, धर्म, परंपरा आणि विचारधारा यांना एकत्र बांधून ठेवणारी ही लोकशाही केवळ शासनपद्धती नाही, तर ती एक जिवंत सामाजिक प्रक्रिया आहे. येथे प्रत्येक निवडणूक ही केवळ सत्ता बदलण्याची घटना नसते; ती जनतेच्या अपेक्षा, आकांक्षा आणि भविष्याविषयीच्या विश्वासाची अभिव्यक्ती असते.

२०१४ मध्ये देशाने एका महत्त्वपूर्ण राजकीय परिवर्तनाचा अनुभव घेतला. नव्या नेतृत्वाकडून जनतेला मोठ्या अपेक्षा होत्या. भ्रष्टाचारावर नियंत्रण, प्रशासनातील कार्यक्षमता, रोजगारनिर्मिती, शेतकऱ्यांचे सक्षमीकरण, आर्थिक विकास आणि जागतिक स्तरावर भारताचे वाढते महत्त्व या अनेक आशा नागरिकांच्या मनात होत्या. त्या काळातील वातावरणात उत्साह होता, परिवर्तनाची भावना होती आणि नव्या युगाची चाहूलही होती.

आज या प्रवासाला बारा वर्षे पूर्ण झाल्यानंतर मागे वळून पाहताना एक संतुलित आणि तटस्थ मूल्यमापन करणे आवश्यक वाटते. कारण कोणत्याही कालखंडाचे मूल्यांकन हे केवळ भावनांच्या आधारे नव्हे, तर वास्तवाच्या आधारावर व्हायला हवे.

या काळात भारताने अनेक क्षेत्रांत लक्षणीय प्रगती केली आहे. देशातील महामार्गांचे जाळे विस्तारले, डिजिटल व्यवहारांमध्ये अभूतपूर्व वाढ झाली, तंत्रज्ञानाचा वापर अधिक व्यापक झाला, अवकाश संशोधनात महत्त्वपूर्ण यश मिळाले आणि जागतिक पातळीवर भारताचा प्रभाव अधिक दृश्यमान झाला. अनेक आंतरराष्ट्रीय मंचांवर भारताची भूमिका अधिक ठळकपणे दिसू लागली. हे बदल नोंद घेण्याजोगे आहेत.

परंतु विकासाची खरी परीक्षा आकडेवारीत नसते; ती नागरिकांच्या दैनंदिन जीवनात असते. एखाद्या शेतकऱ्याला त्याच्या पिकाला योग्य भाव मिळतो का, एखाद्या तरुणाला शिक्षणानंतर रोजगाराची संधी मिळते का, एखाद्या कुटुंबाला वाढत्या खर्चाचा सामना सन्मानाने करता येतो का, या प्रश्नांतून विकासाचे खरे स्वरूप दिसून येते.

गावातील चावडीवर बसलेला शेतकरी, स्पर्धा परीक्षांची तयारी करणारा विद्यार्थी, शहरातील कामगार, लहान व्यावसायिक आणि गृहिणी—हे सर्व विकासाचे प्रत्यक्ष साक्षीदार असतात. त्यांच्या अनुभवांतूनच शासनाच्या धोरणांचे यश किंवा मर्यादा समोर येतात. कारण राष्ट्राची प्रगती तेव्हाच अर्थपूर्ण ठरते, जेव्हा तिचा लाभ समाजातील सर्व स्तरांपर्यंत पोहोचतो.

महागाई हा सामान्य माणसाच्या आयुष्याशी थेट जोडलेला विषय आहे. आर्थिक वाढीचे मोठे आकडे अभिमानास्पद असू शकतात, परंतु घरगुती अर्थसंकल्पाचे गणित वेगळे असते. इंधन, गॅस, अन्नधान्य, शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या मूलभूत गरजांवरील वाढता खर्च अनेक कुटुंबांसाठी चिंतेचा विषय ठरतो. म्हणूनच अर्थव्यवस्थेची ताकद आणि नागरिकांच्या जीवनमानातील सुधारणा यांचा समतोल राखणे आवश्यक असते.

नोटबंदी हा गेल्या दशकातील सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला. या निर्णयामागील उद्दिष्टे महत्त्वाची होती, परंतु त्याच्या परिणामांविषयी समाजात विविध मते व्यक्त झाली. काहींनी त्याला धाडसी पाऊल मानले, तर काहींनी त्यातून निर्माण झालेल्या अडचणींकडे लक्ष वेधले. लोकशाहीमध्ये अशा चर्चांना स्थान असणे हेच तिचे वैशिष्ट्य आहे.

इतिहासाचा अभ्यास केला तर एक महत्त्वाचा धडा समोर येतो. जपान, दक्षिण कोरिया, जर्मनी आणि सिंगापूर यांसारख्या देशांनी दीर्घकालीन प्रगतीसाठी शिक्षण, कौशल्यविकास, संशोधन, उद्योग आणि प्रशासनातील पारदर्शकता यांवर भर दिला. त्यांनी केवळ आर्थिक वाढ साधली नाही, तर नागरिकांच्या जीवनमानातही लक्षणीय सुधारणा घडवून आणली. भारतासारख्या विशाल आणि विविधतेने नटलेल्या देशासाठीही हे क्षेत्र अत्यंत महत्त्वाचे आहेत.

लोकशाहीचा आणखी एक महत्त्वाचा आधारस्तंभ म्हणजे संवाद. प्रश्न विचारणे ही लोकशाहीविरोधी कृती नसून लोकशाहीची ताकद आहे. सरकारचे कौतुक करणे जितके आवश्यक आहे, तितकेच त्याच्या धोरणांचे परीक्षण करणेही आवश्यक आहे. कारण जिथे प्रश्न विचारले जातात, तिथे उत्तरदायित्व टिकून राहते. आणि जिथे उत्तरदायित्व असते, तिथेच प्रगतीची शक्यता अधिक मजबूत होते.


नरेंद्र मोदी हे आधुनिक भारतीय राजकारणातील प्रभावी आणि महत्त्वपूर्ण नेते म्हणून ओळखले जातात. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले, अनेक उपक्रम राबविण्यात आले आणि भारताच्या जागतिक प्रतिमेला नवी दिशा मिळाली. त्याचवेळी त्यांच्या कार्यकाळाविषयी अनेक अपेक्षा, प्रश्न आणि टीकाही व्यक्त होत राहिल्या. ही स्थिती कोणत्याही लोकशाहीत स्वाभाविक असते.

शेवटी, कोणत्याही सरकारचे मूल्यमापन करताना एक मूलभूत प्रश्न कायम राहतो—सामान्य नागरिकाचे जीवन अधिक सुरक्षित, सन्मान्य, समृद्ध आणि आशावादी झाले आहे का? कारण राष्ट्राची खरी ताकद केवळ आर्थिक निर्देशांकांत नसते; ती नागरिकांच्या चेहऱ्यावरील समाधानात, तरुणांच्या संधींमध्ये, शेतकऱ्यांच्या आत्मविश्वासात आणि समाजातील न्याय्य संधींमध्ये असते.

लोकशाहीचा प्रवास हा कधीच पूर्ण होत नाही. तो सतत चालू राहतो. प्रत्येक पिढी त्यात नवे प्रश्न विचारते, नवी उत्तरे शोधते आणि नवी स्वप्ने पाहते. म्हणूनच लोकशाहीचे सर्वात मोठे सौंदर्य म्हणजे तिची आत्मपरीक्षण करण्याची क्षमता. हीच क्षमता राष्ट्राला अधिक सक्षम, अधिक संवेदनशील आणि अधिक प्रगत बनवत असते.

**— पांडुरंग मारुती धुमाळ**

## दैठना खुर्दच्या गोविंद बाबर यांची पोलीस कॉन्स्टेबलपदी निवड; ग्रामस्थांकडून सत्कार



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**दैठना खुर्द :** ता. परतूर येथील दैठना खुर्द गावचे सुपुत्र गोविंद विठ्ठलराव बाबर यांची नाशिक मध्यवर्ती कारागृह येथे पोलीस कॉन्स्टेबल पदावर निवड झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. गोविंद बाबर यांनी कठोर परिश्रम आणि जिद्दीच्या बळावर हे यश संपादन केल्याने गावकऱ्यांनी आनंद व्यक्त केला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून भावी सेवाकार्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या निवडीमुळे दैठना खुर्द गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, गावातील युवकांसाठी ते प्रेरणास्थान ठरले आहेत. या सत्कार समारंभास गावातील नागरिक, युवक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिक्षक सुरेश बोरसे मृत्यू प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करा : अंबादास दानवे

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** वेरूळ येथील शिक्षक सुरेश बोरसे यांच्या मृत्यू प्रकरणाची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, तसेच या प्रकरणातील संबंधित पोलीस अधिकारी व त्यांच्या सोबत असलेल्या व्यक्तींवर कठोर कलमांखाली गुन्हे दाखल करून कारवाई करावी, अशी मागणी शिवसेना नेते तथा राज्याचे माजी विधान परिषद विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे यांनी मुख्यमंत्री यांना पत्राद्वारे केली आहे.

सुरेश बोरसे यांचा मृत्यू हा अत्यंत संतापजनक व वेदनादायी असून राज्यातील कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा असल्याचे दानवे यांनी पत्रात नमूद केले आहे. तसेच या प्रकरणातील आरोपींना अल्पावधीत जामीन मिळाल्याने तपास प्रक्रियेबाबतही संशय निर्माण होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

दानवे यांच्या म्हणण्यानुसार, वैजापूर पोलीस ठाण्यातील अधिकारी नागरगोजे व त्यांचे सहकारी हे खून प्रकरणातील आरोपी रवी आवारे आणि इतरांसोबत तपासासाठी वेरूळ येथे आले होते. यावेळी सुरेश बोरसे यांनी केवळ विचारपूस केल्याने त्यांना मारहाण करण्यात आली. त्यानंतर त्यांना जबरदस्तीने वाहनात बसविण्यात आले, तर विरोध करणाऱ्या कुटुंबीयांनाही धमकावण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या घटनेत अनेक गंभीर प्रश्न उपस्थित होत असल्याचे दानवे यांनी नमूद केले आहे. पोलिसांनी गणवेशाऐवजी खासगी पोशाखात येणे, शासकीय वाहनाऐवजी आरोपींचे विनाक्रमांक वाहन वापरणे, बोरसे यांना वाहनात नेण्यामागील कारण, त्यांच्याशी झालेली कथित मारहाण आणि कुटुंबीयांशी गैरवर्तन या सर्व बाबींची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

घटना १० जून २०२६ रोजी रात्री घडूनही गुन्हा दाखल करण्यास झालेला विलंब संशयास्पद असून त्याचीही चौकशी व्हावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. खुलताबाद पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेला गुन्हा आरोपींना कठोर शिक्षा देण्यासाठी पुरेसा नसून, संपूर्ण घटनाक्रमाचा विचार करून अधिक गंभीर कलमे लावावीत, असेही दानवे यांनी पत्रात म्हटले आहे.

या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या पोलीस अधिकारी नागरगोजे, रवी आवारे व त्यांच्या सहकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, आरोपींचा जामीन रद्द करण्यात यावा आणि बोरसे कुटुंबाला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी अंबादास दानवे यांनी केली आहे. बोरसे कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरू राहील आणि प्रकरण दडपण्याचा अथवा आरोपींना वाचवण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही, असा इशाराही दानवे यांनी मुख्यमंत्री यांना पाठविलेल्या पत्रातून दिला आहे.

## सिटीचौक पोलिसांनी जामा मस्जिद परिसरातून दुचाकी चोरटा केला जेरबंद, 3 मोटारसायकल जप्त

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील ऐतिहासिक जामा मस्जिद आणि कटकट गेट परिसरातून दुचाकी वाहने चोरणाऱ्या एका सराईत चोरट्याला सिटीचौक पोलिसांनी अत्यंत शिताफीने सापळा रचून अटक केली आहे. पोलिसांनी आरोपीकडून वेगवेगळ्या भागातून चोरी केलेल्या एकूण तीन मोटारसायकल हस्तगत केल्या असून, जप्त करण्यात आलेल्या या मुद्देमालाची एकूण किंमत ६५,००० रुपये इतकी आहे. शेख फैजान शेख इरफान असे अटक करण्यात आलेल्या एकोणीस वर्षीय मजूर तरुण आरोपीचे नाव असून तो अंबरहील परिसरातील रहिवासी आहे. या कारवाईमुळे शहरातील दुचाकी चोरांच्या टोळीला मोठा फटका बसला आहे. या यशस्वी कारवाईची सविस्तर हकीकत अशी की, दिनांक ४ जून २०२६ रोजी सिटीचौक पोलीस ठाण्यात दुचाकी चोरीचा एक गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्याचा छडा लावण्यासाठी गुन्हे शोध पथकाने तातडीने कंबर कसली आणि जामा मस्जिद परिसरातील सी.सी.टी.व्ही. फुटेजची कसून तपासणी सुरू केली. फुटेजचे तांत्रिक विश्लेषण करत असताना पोलिसांना संशयित



आरोपीच्या हालचाली आढळून आल्या. यादरम्यान गुन्हे शोध पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, अंबरहील जवळील एका घराच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत चोरी झालेली काळ्या रंगाची एच.एफ. डिलक्स मोटारसायकल उभी करून ठेवलेली आहे. माहिती मिळताच पोलिसांच्या पथकाने रात्रीच्या वेळी तिथे पोहोचून आजूबाजूला दबा धरून अत्यंत गुप्तपणे सापळा रचला. रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास संशयित शेख फैजान हा त्या मोकळ्या जागेत उभी असलेल्या गाडीजवळ आला. त्याने गाडी चालू केली आणि तो तिथून पळून जाण्याच्या तयारीत असतानाच, दबा धरून बसलेल्या गुन्हे शोध पथकाच्या सतर्क अधिकारी आणि अंमलदारांनी त्याला चारी बाजूंनी घेरून जागीच पकडले. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याचे नाव आणि पत्ता विचारला असता त्याने आपली ओळख सांगितली. त्यानंतर पोलिसांनी त्याला विश्वासात घेऊन सदर गाडीबाबत सखोल चौकशी केली. सुरुवातीला त्याने उडवाउडवीची उत्तरे देण्याचा प्रयत्न केला, परंतु पोलिसांनी पोलिसी खाक्या दाखवताच त्याने ती मोटारसायकल जामा मस्जिद परिसरातून चोरल्याची कबुली दिली. पोलिसांनी दोन पंचांसमक्ष ती गाडी घटनास्थळावरून जप्त केली आणि आरोपीला पुढील तपासासाठी पोलीस ठाण्यात आणले. पोलीस कोठडीत असताना वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार त्याची पुन्हा कसून चौकशी करण्यात आली. यावेळी आरोपीने चोरीच्या गुन्ह्याची संपूर्ण साखळीच पोलिसांसमोर उघड केली. त्याने जामा मस्जिद येथून आणखी एक होन्डा कंपनीची युनिकॉर्न गाडी आणि कटकट गेट परिसरातून एक हिरो कंपनीची एच.एफ. डिलक्स गाडी चोरल्याची कबुली दोन पंचांसमक्ष दिली. आरोपीने दिलेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी

## शिवसेना नेते आमदार आदित्य ठाकरे यांचा वाढदिवस वृक्षारोपणाने साजरा



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** राज्याचे माजी पर्यावरण मंत्री, शिवसेना नेते, आमदार आदित्य ठाकरे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. शिवसेना छत्रपती संभाजीनगर शाखेतर्फे शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. राजे संभाजी भोसले सैनिकी शाळा, कांचनवाडी येथे झालेल्या कार्यक्रमास शिवसेना उपनेते सुभाष पाटील, उपजिल्हाप्रमुख किशोर कच्छवाह, विधानसभा संघटक गिरीष चपळगावकर, विभागप्रमुख सुरेश गायके, युवासेनेचे उपजिल्हा युवा अधिकारी देविदास रत्नपारखी, महिला सहसंपर्क संघटक सुनीता देव, जय महाराष्ट्र शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव जयप्रकाश गुदगे, शालेय समिती अध्यक्ष, नगरसेवक सचिन खैरे, प्राचार्य ऋषिकेश पाटील, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. हरी कोकरे, ज्येष्ठ शिक्षिका सुरेखा जैन, अर्चना स्वामी, निर्मलसिंग निकुंभ, दत्तात्रय लोखंडे, सखाराम गायके, मनोहर परसे, अनिल जगताप यांच्यासह सैनिकी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## शैक्षणिक बुद्धिमत्तेपेक्षा भावनिक बुद्धिमत्ता अधिक महत्त्वपूर्ण : संतोष अजमेरा

### एमजीएममध्ये आंतरराष्ट्रीय परिषद यशस्वीपणे संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी




**छत्रपती संभाजीनगर :** सध्याच्या स्पर्धात्मक युगामध्ये शैक्षणिक बुद्धिमत्ता (IQ) की भावनिक बुद्धिमत्ता (EQ)? हा प्रश्न नेहमीच उपस्थित केला जातो. पालक म्हणून जेव्हा माझी मुले शाळेत शिकत असतात, तेव्हा मला आयक्यू अधिक महत्त्वाचा वाटतो. मात्र, समाजाकडे एक जबाबदार नागरिक आणि पालक म्हणून पाहिल्यास, भावनिक बुद्धिमत्तेचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. चांगला आयक्यू तुम्हाला कुशल व्यावसायिक बनवू शकतो; परंतु उत्तम ईक्यूच तुम्हाला आदर्श माणूस आणि चांगला नागरिक बनवतो. विशेषतः आपल्या कारकिर्दीच्या वाढीसाठी भावनिक बुद्धिमत्ता अधिक महत्त्वाची ठरते, असे प्रतिपादन केंद्रीय लोकसेवा आयोगाचे सहसचिव संतोष अजमेरा यांनी केले.

महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १७ व्या आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय शैक्षणिक परिषदेचा समारोप समारंभ आज विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृह येथे संपन्न झाला. केंद्रीय लोकसेवा आयोगाचे सहसचिव संतोष अजमेरा यांनी यावेळी उपस्थितांशी संवाद साधला.

या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोप समारंभास उद्योगपती सी.पी.त्रिपाठी, नॉर्थ बेंगळुरू विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.बी. के.रवी, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, ब्रिजवॉटर स्टेट विद्यापीठाचे प्रा.डॉ.मधुसूदन एन. राव, प्रा.उमा शमा, प्रा.डॉ.जकारी ग्रिफिथ व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना अजमेरा म्हणाले, एमजीएम विद्यापीठाचे मी दोन गोष्टींसाठी विशेष कौतुक करेन. पहिली म्हणजे ही संस्था स्वतःच बहुविद्याशाखीय शिक्षणाचे उत्कृष्ट उदाहरण असून येथे विविध ज्ञानशाखा एकत्रितपणे शिकवल्या जात आहेत. दुसरे म्हणजे या संस्थेला महात्मा गांधी यांचे नाव लाभले आहे. त्यामुळे बहुविद्याशाखीय शिक्षणावरील परिषद आयोजित करण्यासाठी एमजीएमपेक्षा अधिक योग्य ठिकाण असूच शकत नाही.

उद्योग क्षेत्रात बहुविद्याशाखीय कार्यपद्धती ही गरजेतून विकसित झाली. आता हाच दृष्टिकोन शिक्षण क्षेत्रातही रुजताना दिसत आहे. शिक्षण अधिक व्यापक, उपयुक्त आणि समाजाभिमुख बनविण्यासाठी बहुविद्याशाखीय शिक्षणाची संकल्पना महत्त्वाची ठरणार असल्याचे उद्योजक सी. पी. त्रिपाठी यांनी सांगितले.

कुलगुरू प्रा.डॉ.बी.के.रवी यावेळी बोलताना म्हणाले, यशस्वी होण्यासाठी सातत्याने ज्ञान संपादन करणे आवश्यक आहे. या परिषदेच्या यशस्वी आयोजनामागे असंख्य व्यक्तींचे योगदान आहे. अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने आयोजित करण्यात आलेल्या या परिषदेत सर्व व्याख्याने उत्कृष्टरित्या पार पडली. ही परिषद सहभागींसाठी कायम स्मरणात राहणारी ठरली आहे.

विविध ज्ञानशाखांमधील ज्ञानाचे एकत्रीकरण आजच्या काळाची गरज आहे. याच उद्देशाने एमजीएम विद्यापीठ विद्यार्थ्यांसाठी बहुविद्याशाखीय शिक्षणाची संकल्पना प्रभावीपणे राबवत आहे. विविध क्षेत्रांतील कौशल्ये आणि ज्ञान आत्मसात केल्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरमध्ये बहुआयामी जबाबदाऱ्या सक्षमपणे पार पाडता येतात. अशा बहुविद्याशाखीय दृष्टिकोनाला बळ देणारी ही आंतरराष्ट्रीय परिषद एमजीएम विद्यापीठाने यशस्वीपणे आयोजित केली. आगामी १८ व्या आंतरराष्ट्रीय परिषदेचाही आम्ही उत्साहाने भाग घेऊ, असे कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ यांनी यावेळी सांगितले.

परिषदेच्या अहवालाचे वाचन कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.शिव कदम यांनी केले तर आभार अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई यांनी आभार मानले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## सिद्धार्थ ग्रंथालय व माहितीशास्त्र महाविद्यालयात नेत्रदान जनजागृती



**छत्रपती संभाजीनगर:** सिद्धार्थ ग्रंथालय व माहितीशास्त्र राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात जागतिक नेत्रदान दिनानिमित्त प्राचार्य डॉ. मनोहर वानखेडे यांचे "मरन्नोत्तर नेत्रदान जागृती " या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सुनीलजी मगरे , रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सुकेशनी जाधव यांनी जागतिक नेत्रदान दिनी सर्वांना मरणोत्तर नेत्रदान करण्याची शपथ दिली .कार्यक्रमाचे आभार प्रा. असित शेगावकर यांनी मानले. यावेळी प्रा. पूजा गिरी, प्रा.रोहिणी देवकते प्रा. अनिता काकरवाल, प्रा. योगिता मोरे प्रा.दीपक पाईकराव , राईसो स्वयंसेवक पत्रकारिता विभाग विद्यार्थिनी नीता गंगावणे, सुरेश शिरशीकर आदी उपस्थित होते.

## आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त तेजस्विनी सायकलिंग क्लबतर्फे योग पंधरवड्याचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :**तेजस्विनी ट्रेकर्स व सायकलिंग क्लबतर्फे आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त सोनेरी महलपाठिमागे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथे

14 जून ते २१ जून दरम्यान सकाळी 6 ते 8 या वेळेत 15 दिवसांचा योग,प्राणायाम पंधरवडा आयोजित करण्यात आला आहे.यात दररोज विविध योग प्रकारांचा सराव करून घेण्यात येणार आहे. ज्यात सूर्यन मस्कार,ताडासन,वृक्षासन'त्रीकोणासन,भुजंगासन,वज्रासन,पवनमुक् तासन, सेतूबंधासन, शलभासन,पश्चिमोत्तानासन,अर्धमत्स्येंद्रासन,उष्ट्रा सन, पद्मासन,शवासन,कपालभाती अनुलोम-विलोम, भ्रामरी प्राणायाम, नाडीशोधन प्राणायाम योगविषारदांकडून शिकवले जाणार आहेत. तसेच ओशो ध्यान, डायनॅमिक मेडिटेशन, कुंडलिनी मेडिटेशन,नादब्रह्म मेडिटेशन,विपश्यना ध्यान, साक्षीभाव ध्यान याचेही प्रात्यक्षिकांसह ज्ञान साधकांना मिळणार आहे. योग म्हणजे केवळ व्यायाम नाही, तर शरीर, मन आणि आत्म्याचा सुंदर समतोल आहे.निरोगी जीवनशैलीचा संकल्प करत योग व ध्यान आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनविणे,योग करा निरोगी रहा, ध्यान करा ,आनंदी रहा या सूत्रानुसार मोफत आयोजित या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन आयोजक नीता गंगावणे यांनी केले आहे.

## फर्दापूर ग्रामपंचायत आरक्षण सोडत संपन्न




**फर्दापूर :** फर्दापूर येथे ग्रामपंचायत कार्यालय मध्ये आरक्षण सोडत संपन्न शुक्रवारी दुपारी फर्दापूर येथे फर्दापूर गावातील वार्ड वाईज आरक्षण सोडत संपन्न झाले असल्याने यावेळी मंडळ अधिकारी सोयगाव कल्पना दिघोळे व ग्राम महसूल अधिकारी वैभव जाधव ग्रामविकास अधिकारी सुनील मंगरुळे तसेच गावातील नागरिक प्रतिष्ठित नागरिक आजी माजी सदस्य उपस्थित होते

## फर्दापूर परिसरात शेतकरी यांची मागणी थ्री फेज लाईट सकाळी देण्यात यावी

**फर्दापूर :** फर्दापूर परिसरात महावितरण कंपनीने थ्री फेज लाईट सकाळी देण्यात यावी अशी मागणी शेतकरी करीत आहेत सध्या फर्दापूर परिसरात तापमान मोठ्या प्रमाणात वाढल्याने ते 42 ते 43 जात असल्याने यामध्ये महावितरण कंपनीने थ्री फेज लाईट चा वेळ दुपारी साडे बारा वाजता केला असून यामध्ये गुरांना पाणी पाजण्यासाठी हौदा मध्ये पाणी राहत नाही त्यामुळे हे गुरांना पाणी पाजण्यासाठी भर उन्हात हौद भरण्यासाठी जावं लागतं आणि उन्हाळ्यात गुर जास्त पाणी पितात यामुळे महावितरण कंपनीने थ्री फेज लाईट चा वेळ बदलून सकाळी करावा अशी मागणी शेतकरी करीत आहेत येथील शेतकरी नसीम सय्यद या शेतकऱ्यांनी बोअरवेल चे पाणी काढून हौद भरतो आणि एका खड्ड्यात पाणी सोडण्यात येते कारण की चेमेली शिवारात हरीण, रानडुक्कर निलगाय मोर असे जंगली प्राणी या खड्ड्यात पाणी पितात यामुळे महावितरण कंपनीने थ्री फेज लाईट चा वेळ बदलून देण्यात यावा अशी मागणी शेतकरी करीत आहेत

## इंटिग्रेटेड अप्रोच मित्रा आणि स्वास्थ कदम, कार्यक्रमाचा शुभारंभ




**छत्रपती संभाजीनगर, दि. 12 (प्रतिनिधी)- :** अरमान संस्था, एकात्मिक बाल विकास सेवा योजना महाराष्ट्र शासन आणि महिला व बाल विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने गरोदर माता, स्तनदा माता आणि तीन वर्षांखालील बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या 'इंटिग्रेटेड अप्रोच एम-मित्रा आणि स्वास्थ कदम' कार्यक्रमाचे उद्‌घाटन छत्रपती संभाजीनगर येथे उत्साहात संपन्न झाले.

बालकाच्या आयुष्यातील पहिल्या एक हजार दिवसांचे महत्त्व लक्षात घेऊन राबविण्यात येणारा हा कार्यक्रम गरोदर माता व तीन वर्षांखालील बालकांच्या पालकांना पोषण, आरोग्य, स्तनपान, पूरक आहार, बालसंगोपन आणि बालकांच्या सर्वांगीण विकासासंदर्भात शास्त्रीय व विश्वासार्ह माहिती उपलब्ध करून देणार आहे. कार्यक्रमांतर्गत लाभार्थ्यांना व्हॉट्सॲप सेवेद्वारे माहितीपर व्हिडिओ व संदेश, तसेच लाईव्ह टेलिकाउन्सेलिंगद्वारे तज्ज्ञ मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामुळे माता व बालकांच्या आरोग्यविषयक ज्ञानात वाढ होऊन "सुदृढ माता - सुदृढ बालक" हे उद्दिष्ट साध्य करण्यास मदत होणार आहे. या उद्‌घाटन समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून माता व बालकल्याण विभागीय उपायुक्त कृष्णा राठोड, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बाल विकास) डॉ. मंगला पांचाळ, जिल्हा रुग्णालयाच्या बालरोगतज्ज्ञ डॉ. भारती नागरे, डॉ. पवन बालचकित, बाल विकास प्रकल्प अधिकारी रामेश्वर खडसे, गणेश अंधारे, माधुरी भंडारी, अरमान संस्थेच्या कार्यक्रम संचालिका डॉ. शिल्पा जैन, वरिष्ठ व्यवस्थापक डॉ. आकाश शिंदे तसेच कार्यक्रम अधिकारी मोहसीन कतनाळी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी बालकाच्या आयुष्यातील पहिले एक हजार दिवस हे आरोग्यदायी भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

# कार्यक्षम प्रशासनाला नैतिकतेची जोड हवी : उच्च शिक्षण सहसंचालक डॉ.पंकजा वाघमारे' कार्यशाळेत 140 प्राध्यापक, कर्मचा-यांचा सहभाग



**छत्रपती संभाजीनगर, :** अलिकडच्या काळातील कार्यालयीन व्यवस्थापन हे आधुनिक, कार्यक्षम, गतीमान व स्मार्ट बनले आहे. प्रशासनाला पारदर्शकता व उत्तरदायीत्वासोबतच नैतिकतेची जोड असणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन उच्च शिक्षण विभागाच्या सहसंचालक डॉ.पंकजा वाघमारे यांनी केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील आजिवन शिक्षण व विस्तार विभागाच्यावतीने 'पंचसुत्र कार्यालय व्यवस्थापन मॉडेल' या विषयावर सिफार्ट सभागृहात कार्यशाळा घेण्यात आली. आजीवन अध्ययन व विस्तार विभाग ( NEP 2020) आणि उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक यांच्या संयुक्त विद्यमाने स्मार्ट, नैतिक व व्यवस्थापित कार्यालयीन प्रशासन . कार्यक्षम कार्यालये • नैतिक कार्यसंस्कृती • सक्षम प्रशासन या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली. डिजिटल भारत, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, ई-गव्हर्नन्स आणि संस्थात्मक उत्तरदायित्वाच्या पार्श्वभूमीवर कार्यक्षम, पारदर्शक, नैतिक आणि नागरिकाभिमुख प्रशासकीय व्यवस्था उभारण्याच्या उद्देशाने या कार्यशाळेची संकल्पना विकसित करण्यात आली आहे. भारतीय व्यवस्थापन परंपरेतील मूल्याधिष्ठित दृष्टिकोन आणि आधुनिक कार्यालयीन व्यवस्थापन तत्त्वांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात येणार आहे. कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू सल्लागार परिषदेचे सदस्य डॉ प्रसन्न पाटील. उच्च शिक्षण विभागाच्या सहसंचालक डॉ. पंकजा वाघमारे व कुलसचिव डॉ प्रशांत अमृतकर, संचालक डॉ. अश्विन रांजणीकर यांची प्रमुख उपस्थित होती. तर कुलगुरू डॉ. विजय फुलारी अध्यक्षस्थान भूषविले. या कार्यशाळेचे विशेष आकर्षण म्हणजे जागतिक स्तरावर प्रसिद्ध असलेल्या ५ ए व्यवस्थापन तत्त्वज्ञानाचे भारतीय रूपांतर असलेले ठपंचसूत्र कार्यालय व्यवस्थापन मॉडेल,सजगता, सुव्यवस्था, स्वच्छता, संस्कार आणि सतत सुधारणा या पाच तत्त्वांवर आधारित हे मॉडेल कार्यालयीन कार्यक्षमता, शिस्त, नैतिकता आणि संस्थात्मक गुणवत्तावृद्धीसाठी उपयुक्त ठरणार आहे. यावेळी डॉ.पंकजा वाघमारे यांनी 'पीपीटी' सादर करुन विस्तृत मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या, काळानुसार प्रशासनात मोठे फेरबद्दल घडून येत आहेत. गेल्या ३६ वर्षात जागतिकीकरणानंतर प्रशासनाचे अत्यंत वेगाने बदल झाले. 'ई-ऑफीस', पेपर लेस ऑफीस यामुळे कामकाजाला गती मिळाली आहे. प्रशासनाला अधिकाधिक विद्यार्थी केंद्रित बनवून 'कार्य संस्कृती' रुजविणे गरजेचे आहे, असेही डॉ.वाघमारे म्हणाल्या. उद्घानपर भाषणान डॉ.प्रसन्न पाटील म्हणाले, व्यवस्थापनाचे 'कार्पोरायझेशन' झाले असू नकारात्मक पध्दतीने म्हटले जाते. वास्तविक सरकारी, निमसरकारी प्रशासनही 'कॉर्पोरेट' पध्दतीने होण्यास हरकत नाही. तर कायदे व नियम हे अडवणुकीचे साधन म्हणून नव्हे तर लोकांचे काम करण्यासाठी हे नियम असतात याची जाणीव ठेऊन प्रशासन व्हावे, असे अध्यक्षीय समारोपात कुलगुरु डॉ.विजय फुलारी म्हणाले. सहसंचालक कार्यालय पूर्णतः 'ई-ऑफिस' व पेपरलेस बनले आहे. आगामी काळात महाविद्यालय यांचे प्रशासनासाठी पेपर लेस करण्यात येणार असल्याचे डॉ.वाघमारे यांनी सांगितले.

मान्यवरांचे मार्गदर्शन

या एकदिवसीय कार्यशाळेत दिवसभरात विविध मान्यवरांनी मार्गदर्शन केले. यामध्ये ज्ञान स्त्रोत केंद्राचे संचालक डॉ.सुभाष चव्हाण, माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालय प्रशासनावर प्रभाव, सुदर्शन धारुरकर 'टोटल एम्पलॉयी इन्व्हॉलव्हमेंट' वरिष्ठ अंकेक्षक हरिशंकर खेडकर, अकाऊंटींग ॲण्ड रेकॉर्ड किपींग, उद्योजक राम भोगले, टाइम मॅनेजमेंट ॲण्ड इमिक्स, गणेश बनसोड - कार्यालयीन अंकेक्षण व महेश मरकड यांनी 'स्ट्रैस मॅनजमेंट' या विषयावर मार्गदर्शन केले. प्रकुलगुरु डॉ.प्रवीण वक्ते, उद्योजक राम भोगले, व कुलपती नामनिर्देशित व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.गजानन सानप यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यशाळेचा समारोप झाला. कार्यशाळेस चार जिल्हयातून मिळवून प्राचार्य, प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी असे एकुण १४० जण सहभागी झाल्याचे संचालक डॉ.अश्विन रांजणीकर यांनी प्रास्ताविकात सांगितले. डॉ.अशोक सरोदे यांन सूत्रसंचालन तर डॉ.नंदकिशोर खिल्लारे यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी डॉ.आनंद वाघ, डॉ.किरण मोहाडे, डॉ.सचिन बारोडे, प्रा.वैभव झाकडे, डॉ.निशा वाकुडे, शिवाजी मोहिते, शेख खैराती, शेख साजेद आदींनी प्रयत्न केले. कार्यक्रमास अधिष्ठाता, संवैधानिक अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## सोयगाव तालुक्यातील जरंडी ग्रामपंचायतीचे'ऑपरेशन प्लास्टिक'; तेरा किलो प्लास्टिक जमा : स्वच्छतेत कचऱ्याचे ही विलीगिकरन

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.१३ जून

तालुक्यातील जरंडी ग्रामपंचायतीने शनिवारी (दि.१३) रोजी गावात व परिसरात स्वच्छता अभियान राबवून यामध्ये

प्रतिबंधित प्लास्टिकचे संकलन करत तब्बल तेरा किलो प्रतिबंधित प्लास्टिक जमा केले केल्या.जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू यांनी दिलेल्या निर्देशानुसार विशेष अभियान राबवून ही मोहीम राबविली. या मोहिमेत जरंडीत स्वच्छता करून कचऱ्याचे विलीगिकरंन केले ओला कचरा व सुका कचरा असे दोन्ही प्रकारात



कचऱ्याचे ढिगारा गोळा करून नष्ट केले दरम्यान जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सर्व गावात ही मोहीम राबविण्याचे शनिवारी आदेश दिले होते जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी घनकचरा व्यवस्थापनावर (शनिवार) रोजी सर्व ग्रामपंचायतींमध्ये सामूहिक स्वच्छता मोहीम आयोजित करण्याचा निर्णय घेतला होता. या मोहिमेत जरंडी ग्रामपंचायत ने सहभागी होवून परिसर स्वच्छ, शाळा, मंदिर, आदी ठिकाणी हे अभियान राबविले

राहण्याच्या जागा, मंदिरे, शाळा, अंगणवाड्या, नद्या, ओढे, गवताळ प्रदेश, मोकळ्या जागा इत्यादी ठिकाणी जमा होणारे प्लास्टिकचे ढिगारे स्वच्छ करणे हा या मोहिमेचा उद्देश आहे.असे यावेळी सहायक गटविकास अधिकारी अशोक दौड यांनी सांगितले

या मोहिमेत गटविकास अधिकारी अमोल जगताप, सहायक गटविकास अधिकारी अशोक दौड,ग्राम पंचायत अधिकारी सुनील मंगरूळे,संतोषकुमार पाटील,सतिष बाविस्कर,गणेश चौधरी, अंबु राठोड, अनिल शिंदे, आदींची उपस्थिती होती.

## प्रशासनाला लाभार्थी समावेशाची नवे लक्ष हजारो वंचितांना गोरगरिबांना मिळणार रेशनच्या धान्याचा हक्क

### राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेचा सुधारित इष्टांक जाहीर

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** स्वस्त धान्याच्या लाभासाठी हजारो गोरगरीब कुटुंबांना मोठा दिलासा देणारा निर्णय राज्य शासनाने घेतला असून अन्नसुरक्षा अधिनियम 2013 अंतर्गत राज्याच्या अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने जिल्हा निहाय सुधारित इष्टांक जाहीर केला असून परभणी जिल्ह्यासाठी अंतोदय अन्नछत्र योजना आणि प्राधान्य कुटुंब योजनेचा नव्याने कोटा निश्चित केला आहे या निर्णयामुळे पात्र असूनही विविध कारणामुळे लाभापासून वंचित राहिलेल्या अनेक गोरगरीब कुटुंबांच्या आशा पुन्हा पल्लवी झाले आहेत.

राज्य शासनाने दिनांक 2 जूनला प्रसिद्ध केलेल्या परभणी जिल्ह्यासाठी अंतोदय योजनेअंतर्गत 45 हजार 113 शिधापत्रिकांचा तर प्राधान्य कुटुंब योजना अंतर्गत 11 लाख 15 हजार 884 लाभार्थी सदस्यांचा इष्टांक मंजूर केला आहे जिल्ह्यातील लोकसंख्या व किमान लाभार्थ्यांची संख्या संगणकृत शिधापत्रिका व प्रत्यक्ष वापरातील आकडेवारी चा अभ्यास करून आज सुधारित इष्टांग निश्चित केल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे गेल्या काही वर्षात अन्नसुरक्षा योजनेच्या लाभार्थी निवडी संदर्भात अनेकदा ईस्टंका मध्ये बदल केले होते मात्र विविध जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर डिस्टन्स शिल्लक राहत असल्याने अनेक पात्र कुटुंब अद्याप लाभापासून दूर असल्याचे चित्र समोर आले होते या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणाली( आर सी एम एस ) मधील अद्यावत माहितीचा आधार घेत नव्याने पुनर्मूल्यांकन करून राज्यातील सर्व जिल्ह्यासाठी सुधारित निष्ठांक जाहीर करण्यात आला परभणी जिल्ह्यालाही त्याचा लाभ मिळणार आहे परभणी जिल्हा हा कृषीप्रधान जिल्हा म्हणून ओळखला जातो दुष्काळ अवकाळी पाऊस पीक नुकसानीचे चक्र आणि ग्रामीण भागातील आर्थिक अडचणीमुळे मोठ्या प्रमाणावर नागरिक सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर अवलंबून आहेत अशा परिस्थितीत शासनाचे हे पुनर्वाचक महत्त्वाचे मानले जात आहे विशेषतः आर्थिक दृष्ट्या दुर्बल भूमी शेतमजूर विधवा दिव्यांग निराधार आणि सामाजिक दृष्ट्या वंचित घटकांना याचा फायदा होण्याची शक्यता व्यक्त होत आहे जिल्ह्यातील बहुतांश तालुक्यात गेल्या काही वर्षापासून नवीन रेशन कार्ड मंजुरी नाव समावेश आणि लाभार्थ्यांना नोंदणीसाठी अर्ज प्रलंबित असल्याची बाब वेळोवेळी शासनासमोर निदर्शनास आली होती नवीन इष्टांग लागू झाल्यानंतर अशा अर्जाची निकाली प्रक्रियेला गती मिळण्याची अपेक्षा प्रशासनाला आता उपलब्धिष्टांताच्या मर्यादित पात्र लाभार्थ्यांचा समावेश करण्यासाठी अधिक व्यापक संधी उपलब्ध होणार आहे शासनाने आणखीन एक महत्त्वपूर्ण निर्णय घेत राज्यातील शिल्लकिष्ठांकाचा नियमित आढावा घेण्याची घोषणा केली असून जानेवारी व जुलै महिन्यात इस्टांकाचे पुनर्वाटक केले जाणार आहे त्यामुळे भविष्यात लाभार्थी संख्येतील बदल स्थलांतर नवीन पात्र कुटुंबाची वाढ आणि वास्तविक गरज प्रत्येक जिल्ह्याला अतिरिक्त संधी मिळू शकणार आहे अन्नसुरक्षा योजनेचा उद्देश केवळ स्वस्त धान्य वाटप नसून कोणत्याही पात्र व गरजू कुटुंब अन्नसुरक्षा पासून वंचित राहू नये हा आहे शासनाच्या नव्या निर्णयामुळे जिल्ह्यातील हजारो कुटुंबांना नव्याने आशेच्या किरण दिसू लागला असून काही महिन्यात लाभार्थी यादीत वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## राष्ट्रवादीचे आ.विटेकर शिवसेना शिंदेचे गटाचे सईद खान यांच्या भेटीमुळे राजकीय समीकरणे बदलली

### विटा खु येथे एक दिलाने विजयाचा निर्धार.; महायुतीत गोडवा धोंडे जेवणाच्या निमित्ताने

अशोक पवार

**परभणी.:** परभणी हिंगोली स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीच्या तोंडावर योगायोगाने निवडणुकी काळात आलेला धोंड्याचा महिना विटा (खुर्द )येथे झालेल्या धोंडे जेवणाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने थेट आपल्या गावात धोंडे जेवणाचा आमंत्रण देऊन राकाचे जिल्हाध्यक्षआ.राजेश विटेकर दिलेला संदेश हा मुरब्बी राजकारणासाठी अनपेक्षित ठरला. आतापर्यंत अनेक चर्चेला तर उधाण आलेल्या बांधली जात असलेले अनेक राजकीय समीकरणेबदलण्याची चर्चा मतदारसंघात ऐकायला मिळत आहे. एकेकाळी राजकीय मित्र म्हणून ओळखले जाणारे आ. राजेश विटेकर आणि सईद खान यांच्यात विधानसभा निवडणुकीनंतर दुरावा निर्माण झाल्याचे चित्र स्पष्ट दिसत होते झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये या दोन्ही नेतृत्वाने एकमेकांसमोर आव्हान उभे केल्याचे वारंवार दिसून आले त्यामुळे महायुतीमध्ये असूनही जिल्ह्यात मात्र दोन्ही नेत्यांचे सर्व वेगळे असल्याचे चर्चा काय होती याच पार्श्वभूमीवर विधान परिषद निवडणुकीत शिवसेनेकडे उमेदवारी



गेल्यानंतर विरोधी राजकारन्यात गणिते मांडले जात होते राष्ट्रवादी काँग्रेसकडे सर्वाधिक 131 मतांचे संख्याबळ असल्याने आमदार विटेकर यांची भूमिका निर्णायक मानली जाते 468 मतदारांपैकी तब्बल 307 मतांचे बळ महायुतीकडे असल्याने मनाची बेरीज होईल का या तर कवितांना उधाण आले होते मात्र सोनपेठ तालुक्यातील विटा खुर्द या धोंडे जेवणाने या चर्चेला वेगळाच रंग दिला गेला व त्यांचे झालेले जंगी स्वागत गळाभेटी करून एकत्र वावर आणि कार्यकर्त्यांची सांदलेल्या संवाद पाहून राजकीय विश्लेषक नव्याने गणित माणसांना दिसले आमदार विटेकर यांनी यावेळी स्पष्ट शब्दात कार्यकर्त्यांना आवाहन करत सांगितले की आता वैयक्तिक मतभेद विसरून महायुतीचे उमेदवाराच्या विजय करण्यासाठी एक दिलाने कामाला लागा. निवडणुकीच्या रिंगणात महायुतीकडून सईद खान महाविकास आघाडी कडून विवेक नावंदर तर अपक्ष म्हणून सुशील देशमुख मैदानात आहेत त्यामुळे शेवटच्या टप्प्यातील प्रत्येक राजकीय हालचाल महत्त्वाची मानली जात असताना विटा खुर्द येथील धोंडे जेवणाच्या कार्यक्रमाने महायुतीच्या बाजूने वातावरण तयार झाल्याचे बोलले जात आहे राजकारणात कायमचे मित्र किंवा शत्रू नसतात असे म्हणतात हाच प्रत्येक या कार्यक्रमातून आल्याची चर्चा रंगली आहे आमदार राजेश विटेकर आणि गंगाखेडचे आमदार रत्नाकर गुट्टे यांच्या राजकीय समन्वयकडे आधीच लक्ष लागलेले असताना आता सहित खान यांच्यासोबत दिसलेली ही जवळीकता आगामी राजकारणाला नवे वळण देऊ शकते असे राजकीय विश्लेषकाकडून बोलले जात आहे धोंडे जेवणांमुळे झालेली मनोमिलनाची भेट महायुती निवडणुकीत विरोधकांना धाकधूक वाढवणारे वातावरणाची निर्मिती अनेक चर्चेला उदान आले आहे..

## घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग व वेरूळ लेणी परिसरात जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत स्वच्छता अभियान; व, दंडात्मक कारवाईचे आदेश

हिंदू प्रकाश वार्ता, प्रतिनिधी

**खुलताबाद :** वेरूळ येथे जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगरच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनू पी. एम. यांच्या प्रमुख उपस्थितीत जागतिक कीर्तीचे पर्यटन स्थळ असलेल्या घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर आणि वेरुळ लेणी परिसरात व्यापक स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

जिल्ह्यात घनकचरा व्यवस्थापनाची कडक अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली स्थापन करण्यात आलेल्या 'विशेष SWM कक्षा'च्या श्रीमती मिनू पी. एम. या सदस्य आहेत. या पार्श्वभूमीवर आज त्यांनी स्वतः प्रत्यक्ष मैदानावर उतरून या स्वच्छता मोहिमेचे नेतृत्व केले.

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी स्वतः गोळा केला कचरा; ६ ट्रॅक्टर कचरा संकलित

या मोहिमेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे स्वतः मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिनू पी. एम. यांनी हातात झाडू आणि कचरा संकलन पिशव्या घेऊन प्रत्यक्ष कचरा गोळा करण्यास सुरुवात केली. त्यांच्यासोबत पंचायत समिती अंतर्गत कार्यरत असलेले सर्व अधिकारी, कर्मचारी तसेच स्थानिक ग्रामपंचायत प्रशासनाचे कर्मचारी व स्वच्छता दूत या मोहिमेत ताकदीने उतरले होते. सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांतून मंदिर आणि लेणी परिसरातून तब्बल ६ ट्रॅक्टर कचरा संकलित करून त्याची शास्त्रोक्त विल्हेवाटीसाठी रवानगी करण्यात आली.



या मोहिमेदरम्यान श्रीमती मिनू पी. एम. यांनी घृष्णेश्वर मंदिर आणि वेरुळ लेणी परिसरातील व्यावसायिक व दुकानदारांशी थेट संवाद साधला. परिसरात येणाऱ्या पर्यटकांची संख्या लक्षात घेता, दुकानदारांनी आपापल्या दुकान परिसरात ओला व सुका कचरा वेगवेगळ्या डब्यात साठवून स्वच्छता राखणे अनिवार्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी मंदिर परिसरात अस्वच्छता पसरवणाऱ्या दुकानदारांची मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी स्वतः कानउघाडणी करत त्यांना कडक तंबी दिली. तसेच, परिसरात प्लास्टिक कचरा होणार नाही याची काळजी घेण्याचे सांगत प्लास्टिक बंदीचे कडक निर्देश दिले.

अस्वच्छता पसरवणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईचे आदेश

"घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०२६ अंबलबजावणी आदेशानुसार, कचऱ्याचे वर्गीकरण न करणाऱ्या आणि उघड्यावर कचरा टाकून अस्वच्छता पसरवणाऱ्यांवर कडक दंडात्मक कारवाईची तरतूद करण्यात आली आहे. याच नियमांच्या आधारे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मंदिर व लेणी परिसरात अस्वच्छता पसरवणाऱ्या आणि तंबी देऊनही नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दुकानदारांवर तात्काळ दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश उपस्थित ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना दिले.

"घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ च्या अंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतीने कचरा संकलन व प्रक्रियेसाठी उपयोगकर्ता कर आकारणे आणि नियम मोडणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करणे बंधनकारक आहे. ऐतिहासिक व धार्मिक वारसा लाभलेल्या या पर्यटन स्थळांचे पावित्र्य आणि स्वच्छता राखण्यासाठी प्रशासनाकडून यापुढे अशी कडक कारवाई आणि मोहिमा सातत्याने सुरू राहतील," असे संकेत यावेळी प्रशासनातर्फे देण्यात आले.

प्रशासनाच्या या धडक कृतीमुळे वेरुळ परिसरात स्वच्छतेबाबत एक नवा आणि कडक संदेश गेला असून, मंदिर परिसरातील भावीक , स्थानिक नागरिक व व्यापाऱ्यांकडूनही या मोहिमेचे स्वागत करण्यात येत आहे.

या व्यापक स्वच्छता अभियानात लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन श्रमदान केले. यामध्ये प्रामुख्याने गट विकास अधिकारी श्री प्रकाश नाईक,

सभापती- सौ. सुनीता संजय खंडागळे, जिल्हा परिषद सदस्य. कुणाल दांडगे, सरपंच श्रीमती कुसुम प्रकाश पाटील , गट शिक्षण अधिकारी. श्रीमती श्रद्धा ताठे, कृषी अधिकारी. हनुमंत बोयनर, विस्तार अधिकारी . मंगेश शिंदे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी. अभिजीत गायकवाड ग्रामपंचायत अधिकारी गंगाधर गायकवाड आदी उपस्थित होते

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# खंडोबा मंदिरातील दरवाज्याच्या रुंदीवरून ग्रामस्थ आक्रमक

## भविष्यातील भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन किमान सात फूट रुंदीची मागणी; अन्यथा आंदोलनाचा इशारा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :** श्री क्षेत्र खंडोबा मंदिर देवस्थान, सातारा येथे सुरू असलेल्या जीर्णोद्धार कामामधील नगरखाना दरवाज्याच्या बांधकामावरून ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. भविष्यातील भाविकांची वाढती संख्या आणि सुरक्षेच्या दृष्टीने दरवाज्याची रुंदी वाढविण्याची मागणी ग्रामस्थांनी केली असून, मागणीकडे दुर्लक्ष झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

मंदिर परिसरात सध्या नगरखाना दरवाज्याचे बांधकाम सुरू आहे. ग्रामस्थांच्या मते, पूर्वीच्या काळातील लोकसंख्या, वाहतूक आणि सुरक्षेच्या गरजा लक्षात घेऊन हा दरवाजा केवळ तीन ते साडेतीन फूट रुंदीचा ठेवण्यात आला होता. मात्र गेल्या काही दशकांत परिसराची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून मंदिरात येणाऱ्या भाविकांची संख्याही अनेक पटींनी वाढली आहे.

यामुळे आगामी ५० वर्षांचा विचार करून नगरखाना दरवाज्याची रुंदी किमान सात फूट ठेवणे आवश्यक असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. धार्मिक उत्सव, यात्रा, पालखी सोहळे आणि इतर मोठ्या कार्यक्रमांच्या वेळी भाविकांची मोठी गर्दी होत असल्याने अरुंद प्रवेशद्वारामुळे नागरिकांना अडचणी निर्माण होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी नमूद केले.

ग्रामस्थांचा आरोप आहे की, जीर्णोद्धाराच्या नावाखाली ऐतिहासिक वास्तूचे स्वरूप कायम ठेवताना भाविकांच्या सोयी-सुविधांचा पुरेसा विचार केला जात नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने या बांधकामाचा फेरविचार करून आवश्यक तांत्रिक बदल करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, प्रशासनाने ग्रामस्थांच्या भावना आणि भविष्यातील गरजा लक्षात घेऊन योग्य निर्णय घ्यावा, अन्यथा समस्त सातारा खंडोबा गावकऱ्यांच्या वतीने आंदोलन



करून हे बांधकाम रोखण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. यामुळे नगरखाना दरवाज्याच्या रुंदीचा प्रश्न आता स्थानिक पातळीवर चर्चेचा विषय ठरत आहे.

# टाकळी( कुं ) ग्रामस्थांना मिळाला 35 वर्षानंतर न्याय; प्रलंबित फेरफार प्रकरण निकाली

हिंदू प्रकाश वार्ता, प्रतिनिधी

**परभणी :** टाकळी कुंभकरण येथील सन 1990 पासून प्रलंबित असलेल्या प्लॉट फेरफार प्रकरण अखेर निकाली निघल्याने तब्बल 35 वर्षापासून रखडलेले या प्रश्नाला न्याय मिळाल्याने ग्रामस्थांनी महसूल विभागातील अधिकाऱ्यांच्या सत्कार करून कृतज्ञता व्यक्त केली आहे.

ग्रामस्थांनी महत्त्वपूर्ण पाठपुराव्यानंतर जिल्हाधिकारी संजय चव्हाण यांनी याप्रकरणी गंभीर दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली त्यानंतर यांनी विशेष बैठक आयोजित करून ग्रामस्थांचे म्हणणे ऐकून प्रकरण निकाली काढण्यासाठी कारवाई सुरुवात केली तहसीलदार संदीप राजापुरे नायब तहसीलदार मधुकर क्षीरसागर ग्राम महसूल अधिकारी



सोपान कुठे आणि मंडळ अधिकारी ज्योती अडागळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रलंबित प्रकरणी निकाल काढण्यात आली या यशस्वी कार्यवाहीबद्दल टाकळी कुंभकर्ण येथील ग्रामस्थांच्या वतीने महसूल अधिकाऱ्यांच्या भव्य सत्कार करण्यात आला सुरेश शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी सरपंच मुंजाजी माणिकराव पाष्टे माजी जिल्हा परिषद सदस्य तुळशीराम मंचकराव सामाले नारायण राऊत परमेश्वर बोराडे बालाजी निवाळे गंगाधर गडवे वेंकटेश देशमुख यांच्यासम मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते ग्रामस्थांनी सांगितले की फेरफार प्रकरणासाठी गेली 35 वर्षे संघर्ष सुरू होता महसूल प्रशासनाच्या सकारात्मक पुढाकारामुळे ही दीर्घकालीन प्रश्न मार्गी लागला असून अनेक कुटुंबास दिलासा मिळाला आहे प्रशासनाने घेतलेले या निर्णयाचे ग्रामस्थांनी स्वागत केले आहे.

# मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांच्या मार्गदर्शनाखाली गावागावात स्वच्छता मोहीम

## जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींचा उत्स्फूर्त सहभाग; प्लास्टिकमुक्ती व स्वच्छतेबाबत जनजागृती

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात अनेक ठिकाणी रस्ते व सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात कचरा, विशेषतः प्लास्टिकचा कचरा आढळून आल्याने जनजागृती व उपाययोजना करण्याच्या उद्देशाने आज (शनिवार, दि. 13 जून 2026) जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये सामूहिक स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून ती यशस्वीपणे पार पडली.



जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी मोहिमेचे आयोजन केल्याने जिल्हास्तरीय विभाग प्रमुख, गटविकास अधिकारी व अन्य अधिकारी यांनी नेमून दिलेल्या तालुक्यातील गावांना भेटी दिल्या. ग्रामपंचायत परिसर, निवासी भाग, गावाच्या आजूबाजूचा परिसर, मंदिरे, शाळा, अंगणवाड्या, नद्या, ओढे, गवताळ प्रदेश, मोकळ्या जागा यांसह अजिंठा, वेरूळ, घृष्णेश्वर मंदिर आणि दौलताबाद किल्ला परिसरातील स्वच्छता करण्यात आली.

यावेळी नागरिकांना प्लास्टिक वापरावरील बंदीबाबत माहिती देत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. स्वच्छता राखण्यासाठी प्रत्येकाने जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहनही करण्यात आले.

आजच्या स्वच्छता मोहिमेनंतर गावे कायमस्वरूपी स्वच्छ ठेवण्यासाठी ग्रामपंचायतींकडून कचरा टाकणाऱ्या व परिसरात घाण करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. तसेच घरगुती व व्यावसायिक आस्थापनांकडून वापर शुल्कही आकारण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

# कुंभार समाजासाठी 700 ब्रास माती मोफत देण्याच्या निर्णयाचे जल्लोषात स्वागत

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे कुंभार समाजाकडून आभार

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य घटक असलेल्या कुंभार समाजाच्या आर्थिक आणि व्यावसायिक उन्नतीसाठी राज्य शासनाने घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयाचे सर्वत्र स्वागत होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रत्येक कुंभार कुटुंबाला ७०० ब्रास माती मोफत उपलब्ध करून देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला असून, त्यामुळे कुंभार समाजात आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

रांजण, मटके, मातीची भांडी, मूर्त्या, विटा आदी वस्तूंच्या निर्मितीद्वारे पिढ्यानपिढ्या



महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आर्थिक जडणघडणीत मोलाचे योगदान देणाऱ्या कुंभार समाजाच्या पारंपरिक व्यवसायाला या निर्णयामुळे मोठा आधार मिळणार आहे. विशेषतः वाढत्या उत्पादन खर्चामुळे अडचणीत आलेल्या कुंभार बांधवांना या योजनेमुळे दिलासा मिळणार असून, तरुण पिढीही पारंपरिक व्यवसायाकडे आकर्षित होण्यास मदत होणार आहे.

या निर्णयाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर शहरातील बेगमपुरा परिसरात कुंभार समाजाच्या वतीने विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष किशोरदादा शितोळे, मंडल अध्यक्ष अमोल झळके, माजी नगरसेवक गणू पांडे, नागराज गायकवाड, शिवाजी इंजे पाटील आणि संजय फत्तेलश्कर यांचा कुंभार समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी उपस्थित समाजबांधवांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे मनःपूर्वक आभार मानत, हा निर्णय कुंभार समाजाच्या विकासाला नवी दिशा देणारा आणि पारंपरिक व्यवसायाला बळकटी देणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमास सतीश कमलाकर गोडबोले, गणेश जोबले, मनोज कोणे, लक्ष्मण कसारे, रामेश्वर साकडे, रमेश जिरे, किशोर कोणे आणि अजय कोणे यांच्यासह मोठ्या संख्येने कुंभार समाज बांधव उपस्थित होते. "मातीशी नाळ जपणाऱ्या कुंभार समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाने घेतलेला हा निर्णय निश्चितच मैलाचा दगड ठरणार आहे," अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# एल-निनोच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा प्रत्येक प्रत्येक थेंब जमिनीत जिरवा

## 'ग्रामविकास' च्या तिसऱ्या जलमंथन बैठकीत प्राचार्य तेजनकरांचा सल्ला

**छत्रपती संभाजीनगर :** एल-निनोच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा प्रत्येक थेंब जमिनीत जिरवा असे आवाहन प्राचार्य अशोक तेजनकर यांनी शनिवारी, १३ रोजी येथे केले. सिडको एन-२ मधील ग्रामविकास भवनमध्ये मराठवाडा पाणी परिषदेतर्फे आयोजित तिसऱ्या जलमंथन बैठकीत 'रेन वॉटर हार्वेस्टिंग' या विषयावर ते बोलत होते. याप्रसंगी जलतज्ज्ञ डॉ. जयसिंग हिरे, परिषदेचे अध्यक्ष नरहरी शिवपुरे, जल अभ्यासक डॉ. राजेंद्र दाते पाटील, सर्जेराव वाघ, डॉ. के. एम. वांजरवाडकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्राचार्य तेजनकर म्हणाले, आजपर्यंत आपण हजारो वर्षापूर्वी आपल्या पूर्वजांनी साठवून ठेवलेल्या भूगर्भातील पाण्याचा साठा मोठ्या प्रमाणात उपसा केलेला आहे. भूजलाची भरपाई करण्याकरिता शहरातील व्यक्ती, संस्था, संघटना यांनी मोठ्या प्रमाणात 'घर तेथे रेन वॉटर हार्वेस्टिंग' करण्याची आवश्यकता आहे.

जलमंथन बैठकीत नदीजोड प्रकल्प कार्यालय स्थलांतर या विषयावर बोलताना जलतज्ज्ञ डॉ. जयसिंग हिरे म्हणाले नदीजोड प्रकल्प हा दुष्काळी मराठवाड्याला पाणी देण्यासाठी आहे. यामुळे याचे मुख्य कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे असणे आवश्यक आहे. मराठवाडा विभागातील कार्यालय इतरत्र हलविणे जलक्षेत्रासाठी चिंतेची बाब आहे. यावर लोकप्रतिनिधी व जनतेने आवाज उठविला पाहिजे.

प्रस्ताविकात शिवपुरे म्हणाले, जलमंथन बैठकीत वर्तमान जलविषयक विविध प्रश्नांच्या मुळाशी जाऊन, उपाय शोधले जातात व समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन लोकसभागातून अंमलबजावणी केली जाते. बैठकीस इंजि. उमेश लिंभारे , श्रीरंग फरफाडे, डॉ. प्रमोद पाथ्रीकर, दादासाहेब शिंदे, भाऊसाहेब मते, कैलास चव्हाण, डॉ. राहुल महामुनी, एम. एम. जाधवर, शिवाजी घुगे, भारती खरटमल, जलक्षेत्रातील अभ्यासक, संशोधक, सामाजिक कार्यकर्ते, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठक यशस्वी करण्यासाठी बालाजी बिरादार, अर्चना पवार, निवृत्ती घोडके, योगिता शिंदे यांनी परिश्रम घेतले.




# प्रजनन आरोग्य सेवांच्या आधुनिक उपचारावर भर, घाटीत तज्ज्ञांचे मार्गदर्शन

## अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्याहस्ते कार्यशाळेचे उदघाटन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** प्रजनन आरोग्य आणि वंध्यत्व निदान क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान व उपचारपद्धतींची माहिती वैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थी व डॉक्टरांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने घाटीत 'वीर्य विश्लेषण. मूलभूत बाबी आणि वैद्यकीय महत्त्व' या विषयावरील शैक्षणिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रिप्रोडक्टिव्ह बायोलॉजी युनिटच्या आधुनिकीकरणाची आवश्यकता आणि अत्याधुनिक यंत्रसामुग्रीद्वारे रुग्णांना अधिक दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्यावर तज्ज्ञांनी भर दिला.

असोसिएशन ऑफ फिजिओलॉजिस्ट्स ऑफ इंडिया, महाराष्ट्र शाखा अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ, प्राध्यापक, निवासी डॉक्टर तसेच पदव्युत्तर विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे उद्घाटन घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी



सुक्रे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून सिमेन प्रोसेसर प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक डॉ. प्रमोद बजाज उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी शरीरक्रियाशास्त्र विभागाच्या प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. अंजली शेटे यांनी विभागामार्फत रुग्णांना दिल्या जाणाऱ्या विविध सेवा, विभागाची कार्यपद्धती तसेच रिप्रोडक्टिव्ह बायोलॉजी क्षेत्रातील योगदान याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी विभागातील सेवा अधिक प्रभावी व आधुनिक करण्यासाठी अत्याधुनिक यंत्रसामुग्रीची आवश्यकता अधोरेखित केली आणि यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची विनंती केली. प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना डॉ. प्रमोद बजाज यांनी रिप्रोडक्टिव्ह बायोलॉजी युनिटच्या कार्याचा आढावा घेतला. त्यांनी सांगितले की, शरीरक्रियाशास्त्र विभागांतर्गत कार्यरत हे युनिट सन १९७७ पासून कार्यरत असून सिमेन ॲनालिसिसशी संबंधित विविध तपासण्या आणि निदान सेवा येथे दिल्या जातात. वंध्यत्व निदान आणि पुरुष प्रजनन आरोग्याच्या दृष्टीने या तपासण्यांचे विशेष महत्त्व असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बदलत्या वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या युगात या युनिटचे आधुनिकीकरण अत्यावश्यक असल्याचे नमूद करत त्यांनी अद्ययावत यंत्रसामुग्री व आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अधिक अचूक, विश्वासार्ह आणि दर्जेदार सेवा रुग्णांना उपलब्ध करून देता येतील, असे सांगितले. यावेळी त्यांनी सिमेन प्रोसेसर प्रा. लि. द्वारे राबविण्यात येणाऱ्या अत्याधुनिक उपचारपद्धती, तंत्रज्ञान व संशोधनविषयक उपक्रमांचे सादरीकरण केले. तसेच शरीरक्रियाशास्त्र विभाग आणि स्त्रीरोग व प्रसूतिशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वंध्यत्व उपचार व प्रजनन आरोग्य सेवांमध्ये अधिक प्रगत आणि सर्वसमावेशक सुविधा विकसित करण्याची मोठी क्षमता असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

अध्यक्षीय समारोपात अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी संस्थेतील वैद्यकीय सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक त्या सर्व आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधी तातडीने उपलब्ध करून दिला जाईल, असे आश्वासन दिले. यामुळे ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील रुग्णांना अत्याधुनिक वैद्यकीय सेवा शासकीय स्तरावर उपलब्ध होण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010
हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911